# // प्रेसनोट //

## दि. २०/०६/२०२२

## कोविड-१९ या आजारामुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकट नातेवाईकास सानुग्रह सहाय्य प्रदान करण्याबाबत

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिटा याचिका (सिव्हील) क्र. ५३९/२०२१ (गौरवमुमार बंन्सल विरुध्द भारत सरकार) मधील संकीर्ण अर्ज क्र. १८०५/२०२१ मध्ये दि. ४ ऑक्टोबर, २०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि. २६ नोव्हेंबर, २०२१ अन्वये कोव्हिड-१९ या आजारामुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या निकट नातेवाईकास रु. ५०,०००/- इतके सानुग्रह सहाय्य देण्याची ही योजना दि. ०१ डिसेंबर २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने कार्यान्वित करण्यात आली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी दि. २४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

१) कोव्हिड-१९ या आजारामुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकट नातेवाईकास रु. ५०,०००/- इतके सानुग्रह सहाय्य देण्याच्या योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत पुढील प्रमाणे राहिल :-

अ) कोव्हिड-१९ या आजारामुळे दि. २० मार्च, २०२२ पूर्वी मृत्यू झालेला असल्यास दि. २४ मार्च, २०२२ पासून ६० दिवसाच्या आत म्हणजेच दि. २४ मे, २०२२ पर्यंत ऑनलाईन अर्ज केल्यानंतर सदर योजनेचा लाभ घेता येईल.

ब) कोव्हिड-१९ या आजारामुळे दि. २० मार्च, २०२२ पासून पुढे मृत्यू झाल्यास मृत्यूच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत ऑनलाईन अर्ज केल्यानंतर सदर योजनेचा लाभ घेता येईल.

२) वरील नमूद केलेल्या मूदतीनंतरचे अर्ज केवळ गाऱ्हाणे निवारण समितीमार्फत (GRC) केले जातील.

३) या योजनेकरीता ज्या अर्ददारांनी सानुग्रह सहाय्यासाठी चुकीचा दावा दाखल केलेला आहे. त्यांच्याविरुध्द जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ५२प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

४) सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(डॉ. नंदकिशोर लहाने)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**